# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३**

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एस-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**रूपये:- ५१,९६,६३,३८,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (१) | ५२०७ | १० | शासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या दिनांक 01/01/2006 ते दिनांक 31/03/2009 या कालावधीतील थकबाकीची स्तर 2 मध्ये जमा असलेली रक्कम व त्यावरील देय व्याज प्रदान करण्यास शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अंनियो 2018 /प्र.क्र.288/ सेवा-4, दिनांक 08/10/2021 अन्वये मान्यता देण्यात आल्याचे व जमा रकमांच्या परताव्याची कार्यवाही मार्च 2022 अखेरपर्यंत पूर्ण होणे आवश्यक असल्याचे शासन परिपत्रक क्रमांक शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक अंनियो/प्र.क्र.288/सेवा-4,दि.23/02/2022 मध्ये नमूद करण्यात आले असतानाही अन्न व औषध प्रशासनातील अनेक अधिकारी व कर्मचारी यांना रक्कम प्रदान करण्यात आलेली नसणे, अशाचप्रकारे अन्न व औषध प्रशासनात सध्या कार्यरत, सेवानिवृत्त व मृत्यू पावलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे इतरही लाभ प्रदान करण्याबाबत विलंब झाला असणे, सदर विलंबास जबाबदार आहरण व संवितरण अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (२) | ५२१२ | १० | सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय शिक्षण महाविद्यालयाचे लेखापरीक्षण करण्यासाठी शासनाने तीन लेखापरीक्षक नियुक्त केले असणे, या तिन्ही लेखापरीक्षकांनी वैद्यकीय महाविद्यालयात येऊन लेखापरीक्षण केले असणे, सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय शिक्षण महाविद्यालयात अनियमित कारभार सुरू असून, त्याची प्रशासकीय चौकशी करण्यात यावी, अशी वैद्यकीय शिक्षण सचिव, व कोकण आयुक्त यांच्याकडे होत असलेली मागणी, मागणीवरून शासनाने लेखा परीक्षण समिती नियुक्त केली असणे, यात लेखा व दक्षता विभागाचे लेखाधिकारी सदानंद सावंत, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सहायक संचालक मनीष जाधव, वैद्यकीय शिक्षण विभागाचे लेखाधिकारी रामराव चव्हाण यांचा समावेश असणे, सदर तीन सदस्यीय समितीने सिंधुदुर्गच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असलेले सर्व डॉक्टर व अन्य कर्मचारी प्रति नियुक्तीवर असून एकही अधिकारी, कर्मचारी नियमित नसणे, स्वच्छतेबाबत गंभीर समस्या असून स्वच्छतेसाठी १० लाख ५६ हजाराची तरतूद असूनही तेथील स्वच्छता होत नसणे, वैद्यकीय महाविद्यालयात झालेली भरती प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने झाली असल्याचा, भरती प्रक्रिया पूर्ण होण्याआधी कर्मचारी नियुक्त करण्यात आल्याचा फर्निचरसह अन्य साहित्य खरेदी करताना रीतसर प्रक्रिया केलेली नसणे, पहिल्या तुकडीच्या मुलांचे घेतलेले प्रवेश शुल्क शासकीय दप्तरी जमा करण्यात आलेले नसणे, इत्यादी आक्षेप नोंदवले असणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू होऊन वर्ष झाले असताना दुसऱ्या तुकडीने प्रवेश घेतला असणे, एका वर्षासाठी १०० मुलांच्या प्रवेशाची क्षमता असूनही महाविद्यालय सुरू झाल्यापासून प्रशासकीय कारभारावर नाराजी व्यक्त होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (३) | ५२१५ | १० | पुणे शहरात १४४ वर्षांपासून डॉक्टरांना घडविणारे बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय स्वायत्त करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, गेल्या चार वर्षांपूर्वी सादर केलेला स्वायत्ततेचा प्रस्ताव सरकार दरबारी धुळखात पडला असणे, बी. जे. मेडिकल स्कूलची स्थापना १८७८ साली झाल्यानंतर १९४६ मध्ये त्याचे रूपांतर वैद्यकीय महाविद्यालयात झाले असणे, आतापर्यंत या महाविद्यालयाने असंख्य तज्ज्ञ डॉक्टर निर्माण केले असणे, पण, आता बदलत्या कालानुरूप शिक्षण व्यवस्थेत या संस्थेला स्वायत्ततेची निर्माण झालेली गरज, त्यासाठी चार वर्षांपासून हा प्रस्ताव राज्य सरकारला पाठविला असणे, राज्यात २००९ मध्ये उद्रेक झालेला स्वाइन फ्ल्यू, मार्च २०२० पासून थैमान घातलेल्या कोरोनामध्ये बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न ससून रुग्णालय हेच रुग्णांसाठी उपचाराचे प्रमुख केंद्र असणे, शहर आणि परिसरातील लोकसंख्या वेगाने वाढत असताना लोकसंख्येची घनताही त्या प्रमाणात वाढत असणे, शहराच्या परिसरात औद्योगीकरणाचा वाढता वेग, माहिती तंत्रज्ञानामुळे कुशल मनुष्यबळ निर्माण होत असणे, त्याचबरोबर मोठ्या संख्येने तरुण वर्ग पुण्यात येत असणे, बांधकाम व्यवसायासह इतर उद्योगांचा विकसित होत असल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकही पुणे आणि परिसरात येत असणे, त्याच वेळी या लोकसंख्येसाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा त्यांच्या आवाक्याबाहेर असताना स्वायत्तता मिळाल्याने बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात अतिविशेष रुग्णसेवा विकसित करता येण्याची निर्माण झालेली शक्यता, ससून रुग्णालयात अद्ययावत इंटर्व्हेशनल रेडिओलॉजि, नवजात अर्भक, वैद्यकीय अतिदक्षता विभाग, डायलिसिस केंद्र, ट्रॉमा सेंटर कार्यान्वित केलेले असणे, उद्योगांची सामाजिक जबाबदारी (सीएसआर) आणि सरकारी निधी या माध्यमातून ससून रुग्णालयाचा कायापालट केला असताना महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन प्रकल्प सुरू असणे, दरवर्षी दहा कोटी रुपयांपर्यंत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आंतरराष्ट्रीय संशोधन निधी महाविद्यालयाला मिळत असणे, भरीव निधी मिळणाऱ्या देशभरातील महाविद्यालयांमध्ये बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय अग्रक्रमावर असल्यामुळे या संशोधनाला चालना मिळण्यासाठी महाविद्यालयाची स्वायत्तता आवश्यक असतानाही त्याबाबत अद्यापही कोणताही निर्णय झाला नसल्यामुळे पुणे परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेली नाराजीची भावना, यासंदर्भात करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (४) | ५२४५ | १० | राज्यात वैदयकिय शिक्षण पूर्ण करणा-या विदयार्थ्यांनी ग्रामीण भागात एक वर्ष सेवा करणे बंधनकारक असून तसे न केल्यास त्याऐवजी दहा लाख रुपये दंड भरावा लागत असणे, बरेच विदयार्थी हा दंड भरुन ग्रामीण भागात सेवा देण्यास नकार देत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असणे, ग्रामीण भागात डॉक्टरांची नितांत गरज असताना वैदयकीय शिक्षण पूर्ण करणा-या डॉक्टरांना ग्रामीण भागात सेवा देणे बंधनकारक करण्याबाबत शासनाने शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (५) | ५२५२ | १० | राज्यातील १६ वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे व्यवस्थापन "हॉस्पिटल मॅनेजमेंट अँड इन्फो सिस्टीम, (HMIS)" या खाजगी कंपनीकडे असताना ही सेवा वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाच्या आदेशानुसार दि.६ जुलै, २०२२ रोजीपासून कोणतीही पूर्वसूचना न देता पूर्णतः बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, त्यामुळे रुग्णसेवा विस्कळीत झाली असून नियोजित शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या असणे, परिणामी या रुग्णालयांतील संपूर्ण ऑनलाईन यंत्रणा बंद पडलेली असून ही कामे ऑफलाईन पध्दतीने करावी लागत असल्यामुळे रुग्णांच्या नोंदणी ते रिपोर्ट पर्यंतच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असणे,कोणतीही पूर्वतयारी न करता अचानक 'एचएमआयएस'ची सेवा बंद करण्यात आल्याने व पर्यायी व्यवस्था न देता जुन्या ऑफलाईन पद्धतीने कामकाज करण्याचे आदेश देण्यात आल्याने स्वा. रा. ती. ग्रा. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई. जि. बीड सह राज्यातील १६ रुग्णालयात रुग्णाची मोठी गैरसोय होत असल्याने पूर्वीप्रमाणेच 'एचएमआयएस' प्रणालीद्वारेच कामकाज सुरु ठेवण्याबाबत ची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व सचिव, संचालक, वैद्यकीय शिक्षण विभाग यांच्याकडे दिनांक ०६ जुलै,२०२२ रोजी व मा. वैद्यकीय मंत्री यांचेकडे दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली असता त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करुन रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी सक्षम पर्यायी व्यवस्था करण्याची आवश्यकता. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (६) | ५२१३ | १० | केंद्र सरकार एकीकडे देशभरात विशेषज्ञ डॉक्टर वाढवण्यासाठी पदव्युत्तर जागा वाढवण्याची घोषणा करत असणे, दुसरीकडे राज्यात वैद्यकीय शिक्षण विभागाने आयुर्वेद शिक्षकांच्या बदल्या केल्याने बऱ्याच शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांतील पदव्युत्तर आणि 'पीएचडी'च्या जागांना कात्री लागलेली असणे, त्यामुळे वैद्यकीय शिक्षण खात्याचे बदली धोरण वादात सापडलेले असणे, नागपुरातील शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयातील रोगनिदान विभागाचे सहयोगी प्राध्यापक यांची प्राध्यापक पदावर शासनाने उस्मानाबादला बदली केलेली असणे, त्यामुळे नागपुरातील ते गाईड असलेल्या विषयातील ३ 'पीएचडी' आणि २ पदव्युत्तरच्या जागा कमी झालेल्या असणे, नागपुरातील शालक्य विभागाचे अधिव्याख्याता यांची पदोन्नतीवर सहयोगी प्राध्यापक म्हणून जळगावला बदली झालेली असणे, त्यामुळे नागपुरातील या विषयाच्या २ पदव्युत्तर जागा घटलेल्या असणे, नागपुरातील रसशास्त्र विभागाचे अधिव्याख्याता यांची जळगावला तर या विभागातील दुसरे अधिव्याख्याता यांचीही पदोन्नतीवर उस्मानाबादला सहयोगी प्राध्यापक म्हणून बदली झालेली असणे,राज्यात जळगावचे महाविद्यालय नवीन असल्याने तेथे पदव्युत्तर अभ्यासक्रम नसणे, त्यामुळे तेथे टेकाडे यांच्या नियुक्तीने पदव्युत्तर जागेचा फायदा झालेला नसणे, उलट नागपुरातील या दोन अधिव्याख्यात्यांच्या बदलीने रसशास्त्र विषयातील ३ 'पीएचडी' आणि २ पदव्युत्तरच्या जागांना कात्री लागलेली असणे, या बदल्या गेल्या काही महिन्यातील असल्या तरी जानेवारी २०२२ मध्येही उस्मानाबाद येथील महाविद्यालयातील बालरोग विभागाचे अधिव्याख्याता यांची मुंबईच्या महाविद्यालयात बदली झालेली असणे, तेव्हापासून त्यांच्या उस्मानाबाद येथील ३ पीएचडी आणि २ पदव्युत्तर जागा कमी झालेल्या असणे, उस्मानाबादचे अधिव्याख्याता यांची नागपुरात बालरोग विभागात बदली झाल्यामुळे त्यांच्या बदलीनेही उस्मानाबादच्या १ पदव्युत्तर जागेला कात्री लागलेली असणे, त्यामुळे वैद्यकीय शिक्षण खात्याच्या चुकीच्या बदली धोरणाने राज्यातील पदव्युत्तर व पीएचडीच्या जागा कमी होवून केंद्र सरकारच्या विशेषज्ज्ञ तयार करण्याच्या उद्देशालाच हरताळ फासला जात असणे, त्यामुळे वैद्यकीय विभागातील अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (७) | ५२२८ | १०० | बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय येथे प्रसूती विभागात दररोज दाखल होणाऱ्या महिलांची संख्या खूप जास्त असून प्रसूतीनंतर त्यांना आवश्यक असलेल्या खाटांची संख्या पूरक प्रमाणात उपलब्ध नसणे, अनेकवेळा प्रसूती नंतर माता व नवजात बालकास फरशीवर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | झोपवण्याची वेळ रुग्णालय प्रशासनावर येत असणे, त्यामुळे प्रसूती कक्षासाठी वाढीव 200 खाटांची इमारत बांधण्याची आवश्यकता असणे व याबाबत लोकप्रतिनिधीनी केलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| (८) | ५२३१ | १०० | बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय येथे दाखल होणाऱ्या विविध आजारांवरील व दुर्धर आजारांवरील रुग्णांची संख्या मोठी असल्याने याठिकाणी सर्व विभागाचे तज्ञ डॉक्टर व विभागप्रमुखांची गरज असणे मात्र या महाविद्यालयात विभागप्रमुख, तज्ञ अशी वर्ग एक ची 21 पदे रिक्त असल्याने रुग्णांची मोठी गैरसोय होत असणे व त्यामुळे ती वर्ग एकची सर्व 21 पदे भरण्याबाबत होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| (९) | ५२३३ | १०० | बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय येथे रुग्णांच्या विविध तपासण्या करण्याच्या उद्देशाने सुमारे 17 कोटी रुपयांची 3.0 टेस्ला एम आर आय मशीन बसवण्यात आलेली असणे, मात्र या एमआरआय मशीनला तज्ञ संचालक व आवश्यक वीज पुरवठा सुरू नसल्याने ती धूळ खात पडून असणे, सदर मशीन रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या रोग निदानासाठी अत्यंत महत्वाची असणे, ग्रामीण भागातील रुग्णांचे एमआरआय करण्यासाठीचे हजारो रुपये वाचवणारी ही मशीन स्वतंत्र वीज पुरवठा व तज्ज्ञांची नेमणूक करून पूर्ण क्षमतेने सुरू करण्याबाबत होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१०) | ५१८९ | १० | महाराष्ट्रातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व रुगणालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ ) मागील अंदाजे १२ ते १५ वर्षापासून अस्थायी म्हणुन काम करीत असणे, दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यत निवासी वैद्कीय अधिका-यांच्या सेवेला सलग दोन वर्षे झालेली असणे, या निवासी वैद्कीय अधिका-यांनी कोविड काळात देखील आपल्या जीवाची पर्वा न करता फ्रंटलाईन वर्क केलेले असणे, त्यांच्या सरळ सेवेमधील समावेशनाचा प्रस्ताव सचिव कार्यालय वैद्कीय शिक्षण विभाग येथे प्रलंबित असणे, महाराष्ट्रातील लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी वैद्यकीय अधिका-यांनी मॅट कोर्ट औरंगाबाद येथे सदरील विषयावर अपील केलेले असणे, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी मॅट कोर्टाने सदरील वैद्यकीय अधिका-यांना शासन सेवेत समाविष्ट करुन घेण्याचे आदेश दिलेले असणे, सचिव कार्यालयातील प्रलंबित प्रस्तावामध्ये ज्या वैद्यकीय अधिका-यांनी शासन सेवेमध्ये दोन वर्षपेक्षा अधिक कार्यकाळ काम केलेले असणे, अशा वैद्कीय अधिका-यांचा सरळ वैद्यकीय सेवेत समावेश |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करण्यात यावे असे नमूद असणे, वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये या पूर्वीही ज्या सहाय्यक प्राध्यापक डॉक्टरांनी २ वर्षापेक्षा अधिक काम केलेले आहे त्यांचे सलग चार वेळा समावेशन केले आहे. निवासी वैद्कीय अधिका-यांचे आजमितीपर्यंत एकदाही समावेशन करण्यात आलेले नाही. महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिका-यांचे मॅट कोर्ट औरंगाबाद यांच्या निर्णयानुसार समावेशन करण्यात यावे अशी निवासी वैद्यकीय अधिकारी याची मागणी असणे, परंतू अद्यापही या निवासी वैद्कीय अधिका-यांचा सरळसेवेत समावेश करण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना लक्षात घेता शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया |
| (११) | ५१९० | १० | "नागपूर, चंद्रपूर जिल्हयासह राज्यातील निवासी डॉक्टरांनी विविध मागण्यासाठी २ जानेवारी,२०२३ पासून संप पुकारला असणे, मार्डच्या डॉक्टरांन सर्व विभागातील सेवा बंद ठेवली असणे, त्याचा फटका रुग्णांना बसला असणे, विशेषत: नागपूर, चंद्रपूरसह मोठया शहरातील रुग्णांना मोठया प्रमाणावर फटका बसला असणे, रुग्णालयातील लहान शस्त्रक्रिया पुढे ढकलल्या असणे, तर अतिमहत्वाच्या शस्त्रक्रिया◌ा सुध्दा झालेल्या नसणे, औषधोपचारा अभावी रुग्ण दगावले असणे, याची जबाबदारी शासनाने घेण्याची आवश्यकता असणे, डॉक्टरांच्या मागण्या मान्य केल्या नसणे, महागाई भत्ता, स्टायफंडसह ईतर अनेक महत्वाच्या मागण्या मान्य करण्याची आवश्यकता असताना सुध्दा याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष,त्यामुळे नागरिकासह डॉक्टर व रुग्णांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण याबाबात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." |
| (१२) | ५२०० | १० | कागदपत्राची गोपनियता जपण्यासाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या डिजिटल की ची ऑगस्ट २०२२ मध्ये हाफकीन बायोफार्मा मधून चोरी झाल्याचे निर्देशनास येणे, या डिजिटल की ची उपलब्धता नसल्यामुळे दीडशे कोटी रुपयांच्या निविदा पुन्हा प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्याची वेळ हाफकीन कडे येणे, या गगंभीर प्रकरणाची अघापही चौकशी झालेली नसणे, २०१९-२० आणि २०२०-२१ या वर्षामधील दीडशे कोटी रुपयांची वैघकीय उपकरणांचा पुरवठा करण्याची प्रक्रिया हाफकीन कडून पुर्ण करण्यात आलेली नसणे, या उपकरणा अभावी रुग्णांना आर्थीक व माणसिक त्रास सहण करावा लागणे, ऑक्टोबर २०२२ मध्ये हाफकीन बायोफार्मा च्या मागणीनुसार वैघकीय रूग्णालयांना औषधे व उपकरणांच पुरवठा पुरवठादारांनी केल्यांनतर सुध्दा त्यांची जवळपास १०० कोटी रुपयांचे धनादेश रखडलेले असणे, निविदा मंजूर झाल्यापासून ती संमत होईपर्यात पाच टक्क्याचे कमिशन न दिल्याने हक्काचे पैसे मिळू शकले नाही असा आरोप औषध पुरवठादार करीत असणे, त्यामुळे या सर्व प्रकाराची कोणतीच चौकशी होत नसल्याने रुग्णांचे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मात्र हाल होत असणे, अनेक रुग्णालयात औषधी व उपकरणाचा तुटवडा असतांना सुध्दा व याबाबत हाफकीन कडे मागणी पाठविलेली असतांना सुध्दा ते पुरविल्या जात नसणे, त्यामुळे या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधितावर कार्यवाही होणे बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१३) | ५१८८ | १० | महाराष्ट्र वैद्यकीय आस्थापना कायदा (क्लिनिक इष्टाब्लीशमेंट ॲक्ट) राज्यात लागू न करणे, मागील दहा वर्षांपासून सदर कायदा दुर्लक्षित असणे, सदर कायद्यास खाजगी रुग्णालय लॉबीचा विरोध असणे, केंद्राच्या मूळ मसुदयात काही प्रमाणात बदल करीत देशातील अकरा राज्यात सदर कायदा लागू होणे, महाराष्ट्र राज्यात सदर कायदा लागू करण्यासाठी सन २०१४ व सन २०१८ साली काही बदल व सुधारणा करण्यात येणे, क्लिनिक्स, रुग्णालये, नर्सिंग होम, रक्तपेढ्या, रक्त चाचणी करणाऱ्या प्रयोगशाळा, डायग्नोस्टीक लॅब, डे केअर सेंटर यांची नोंदणी स्थानिक आरोग्य व्यवस्थेकडे नसणे, खाजगी आरोग्य व्यवस्थेला शुल्क आकारण्यासंदर्भात वेसण घालणे गरजेचे असणे, शुल्कासंदर्भात तक्रार करण्यासाठी प्राधिकरण किंवा समिती नसणे, त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १६ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई